राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत यंत्रमाग सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देण्याची योजना सुरु करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र.यंत्रमाग-१३०६/प्र.क्र.१४१/टेक्स्ट -२
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ जानेवारी, २००९.

वाचा :-
१) शासन निर्णय क्र.पीएलएम १२९४/२२३७/प्र.क्र.३०७/टेक्स-२, दि. १९/१०/१९९६
२) शासन निर्णय क्र.यंत्रमाग- १३९८/प्र.क्र.१५८/टेक्स-२, दि. २४/२/१९९९
३) शासन निर्णय क्र.यंत्रमाग- १३२००२/प्र.क्र.८५/टेक्स-२, दि. १९/९/२००३
४) शासन निर्णय क्र.यंत्रमाग- १३२००२/प्र.क्र.८५/टेक्स-२, दि. २६/२/२००४

प्रस्तावना :

राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी यंत्रमाग धारकांकरिता तयार केलेली योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याचा निर्णय संदर्भिय दिनांक १९ ऑक्टोबर १९९६ अन्वये घेण्यात आला होता. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी घेतलेल्या आदेशांचे एकत्रिकरण करुन संदर्भिय शासन निर्णय दि. २४ फेब्रुवारी, १९९९ रोजी निर्गमित करण्यात आला होता.

उपरोक्त योजनेचा आढावा घेवून उर्वरित दायित्वांचे प्रस्तावाशिवाय अन्य प्रस्तावास अर्थसहाय्य वितरित न करण्याचा व योजना बंद करण्याचा निर्णय संदर्भिय दि. ११ सप्टेंबर, २००३ अन्वये घेण्यात आला होता. या निर्णयाचा फेरविचार होवून संदर्भिय शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, ०४ अन्वये १७२ प्रस्तावाना अर्थसहाय्य देण्याचा व त्यानंतर योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. वरीलप्रमाणे २६/२/०४ च्या आदेशान्वये बंद असलेली योजना पुनः सुरु करण्याची मागणी वस्त्रोद्योग क्षेत्राकडून सातत्याने शासनाकडे सुरु होती. तसेच, आतापर्यंत (ऑक्टोबर १९९६ पासून हि योजना बंद होईपर्यंत) या योजनेचा यंत्रमाग संस्था व व्यवसायाच्या संदर्भात अनुशेष

असलेल्या विदर्भ व मराठवाडा विभागातील जनतेकडून/संस्थाकडून योजना सुरु करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत होता. त्यामुळे प्रादेशिक अनुशेषाच्या संदर्भात मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार या दोन विभागाना या योजनेचा प्राधान्याने लाभ देण्यासाठी हि योजना पुनः सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- मंत्रीमंडळाच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ च्या बैठकीत सर्वकंष विचार होऊन यंत्रमाग सहकारी संस्थांना राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत योजनेखाली अर्थसहाय्य देण्याची योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार खालील शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.:-

(एक) राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत यंत्रमाग सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देण्याची योजना राष्ट्रीय सहकारी विकास निगमच्या सुधारित पॅटर्नप्रमाणे सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तथापि, या योजनेसाठी प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात उपलब्ध होणा-या आर्थिक तरतुदीच्या मर्यादेत संस्थांचे प्रस्ताव मान्य करण्यात यावेत.

(दोन) या योजनेखाली अर्थसहाय्यासाठी मार्जिन मनी, भाग खरेदी अथवा लुम्स असलेल्या वर्कशेडचे बांधकाम/आधुनिकीकरण/नुतनीकरण/बांधकाम/गोदामे उभडणे/ शोरुम/मार्केटींग कॉम्प्लेक्स/सहकारी वस्त्रोद्योग इस्टेट व मागावर येण्याआधीची वा नंतरची प्रक्रिया/ निटींग/ तयार कपडे/शिलाई केंद्रे यांची स्थापना करण्याबाबतच्या प्रस्तावाची राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडे शिफारस करण्यात यावी.

(तीन) ही शिफारस करताना प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने उर्वरित महाराष्ट्रातील प्रमाणात विदर्भ व मराठवाडा विभागातील यंत्रमाग सहकारी संस्थांच्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी प्राधान्याने विचार करण्यात यावा, त्यानंतर उर्वरित महाराष्ट्रातील प्रस्तावांचा विचार करण्यात यावा.

(चार) राज्यामध्ये प्रत्येक वैधानिक विभागात एक या प्रमाणे तीन एकात्मिक प्रकल्पांची प्रायोगिक तत्वावर उभारणी करण्यात यावी.

(पाच) वरील योजना सुरु करण्यासाठी मंत्रिमंडळाने दि.२४/११/०१ रोजी केंद्रीय वित्तीय संस्थाकडून सहकारी संस्थांच्या प्रस्तावांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी कोणतेही थेट वित्तीय दायीत्व स्वीकारु नये असा जो निर्णय घेतला आहे तो रा.स.वि.नि.पुरस्कृत यंत्रमाग सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देण्याच्या या योजनेबाबत शिथिल करुन योजने अंतर्गत

यंत्रमाग सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देण्यासाठी रा.स.वि.नि. कडून कर्ज घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर यांनी वरील निर्णयानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

उपरोक्त योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात यापूर्वी विविध आदेशांद्वारे विहित केलेल्या अटी/शर्ती कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि. व. जाधव )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे.
२. संचालक, (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. कार्यकारी संचालक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ४, सिरी इन्स्टिटयूशनल एरिया, हौजखास, नवी दिल्ली.
४. प्रादेशिक संचालक (पश्चिम), राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ५, बी.जे.रोड,पुणे.
५. प्रादेशिक उपसंचालक , (वस्त्रोद्योग), सोलापूर/औरंगाबाद/नागपूर/मुंबई.
६. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
७. महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी,(सर्व).
१०. वित्त विभाग (कार्यासन व्यय-२/ बजेट-१२/बजेट-१९ ), मंत्रालय, मुंबई ३२.
११. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१२. खाजगी सचिव, मा. मंत्री/मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग)
१३. मा.मुख्यमंत्री कार्यालय/ मा. उपमुख्यमंत्री कार्यालय
१४. सर्व कार्यासने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय. मुंबई.
१५. निवड नस्ती (टेक्स-२)

..............